जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १६९ | शनिवार, १० जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# पुणे मेट्रोवरून उपमुख्यमंत्री पवार व मोहोळांमध्ये श्रेयवादाची लढाई

## अजित पवारांचा भाजपवर हल्लाबोल; मुरलीधर मोहोळांचे प्रत्युत्तर

**संतोष मुंडे**

पुणे, ता. ९ : पुणे मेट्रो प्रकल्पाच्या श्रेयावरून सत्ताधारी भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात पुन्हा एकदा वाद रंगला आहे. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या काळात पुणे मेट्रोला मंजुरी मिळाली होती. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी राज्य सरकारमधून मेट्रोला मदत देत आहोत, असा दावा करणाऱ्या भाजपला आरसा दाखवण्याची गरज आहे, अशी टीका अजित पवार यांनी केली आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुरू केलेल्या अलार्म मोहिमेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत पवार बोलत होते. यावेळी त्यांनी पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांतील सत्ताधाऱ्यांवरही जोरदार टीका केली.



दोन्ही महापालिकांतील कारभाऱ्यांनी मूलभूत नागरी प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा ढासळल्या असून, याच जनतेच्या असंतोषाचा अलार्म वाजवण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. पाच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील सभेत मागील पाच वर्षांत आम्ही काय केले, हे विचारणाऱ्यांनी आरसा पाहावा, असे वक्तव्य केले होते. यावर अजित पवार यांनी भाजपला जोरदार प्रत्युत्तर दिले.

पुणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या आणि शहरांचा चारही दिशांना होत असलेला विस्तार लक्षात घेता, भविष्यात दोन नवीन महानगरपालिका होऊ शकतात, असे सूतोवाच पवार यांनी केले. हडपसरच्या पुढील भागांचा समावेश करून चाकण तसेच आळंदी-वाघोली परिसरासाठी स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करता येतील. राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत आल्यास या दोन महापालिका स्थापन केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा आणि वाढते प्रदूषण या प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. या ढासळलेल्या नागरी सुविधांमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत असल्यानेच अलार्म मोहीम हाती घेण्यात आली असल्याचे पवार म्हणाले. राष्ट्रवादी सत्तेत आल्यावर बीडीपीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासनही पवार यांनी दिले.

महापालिकेतील सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधताना अजित पवार म्हणाले की, गेल्या नऊ वर्षांत पुण्यातील विकासकामांसाठी सुमारे ७५ हजार कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा केला जातो. मात्र, शहरात ठोस विकासकामे कुठेच दिसत नाहीत. मग हा निधी नेमका गेला तरी कुठे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे प्रत्युत्तर

मोहोळ म्हणाले की, मेट्रोमॅन ई. श्रीधरन यांनी २००९ मध्ये पुणे मेट्रोचा अहवाल सादर केला होता. त्यानंतर २०१० मध्ये पुणे महानगरपालिकेने वनाज ते रामवाडी मार्गाला मान्यता दिली. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना खर्चाचा मुद्दा उपस्थित करून मेट्रोसाठी निधी देण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे केवळ एका मार्गाचा प्रस्ताव दिल्लीला पाठवावा लागला. नंतर दोन्ही मार्गांचे प्रस्ताव पाठवण्याचे आदेश आल्याने वेळ वाया गेला आणि मेट्रोचा खर्च ८ हजार कोटींवरून १० हजार कोटींवर पोहोचला. त्यामुळे पुणे मेट्रो रखडण्यास अजित पवार यांच्या पक्षाचीच जबाबदार असल्याचा आरोप मोहोळ यांनी केला.

दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवार यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. २००१ ते २०१४ या काळात पुण्यात मेट्रोवर केवळ चर्चा झाली; प्रत्यक्षात एक इंचही काम झाले नाही, असे ते म्हणाले. त्या काळात डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान आणि अजित पवार पुण्याचे पालकमंत्री होते. भाजपच्या काळातच मेट्रोचे काम सुरू झाले आणि प्रत्यक्ष मेट्रो धावू लागली, असा दावा मोहोळ यांनी केला आहे. मंत्री मोहोळ म्हणाले, २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुणे मेट्रोला अंतिम मान्यता मिळाली. पुणे मेट्रोवरून सुरू असलेला हा श्रेयवाद महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर अधिकच तीव्र होणार असल्याचे दिसून येत आहे.

---

### संक्षिप्त

#### वाघोली येथे अपघातात एकाचा मृत्यू; एक जण गंभीर

**वाघोली, ता. ९ :** नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात भरधाव डंपरने दुचाकीला धडक दिल्याने सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिमा अरुण नोनंदकर (वय ३४, रा. दत्तनगर, दिघी) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार अरुण हनुमंत नोनंदकर (वय -३८) जखमी झाले आहेत. अरुण यांनी याबाबत वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार अरुण आणि त्यांची पत्नी प्रतिमा हे ६ जानेवारी रोजी नगर रस्त्याने दुपारी एकच्या सुमारास निघाले होते. आव्हाळवाडी फाटा चौकात भरधाव डंपरने दुचाकीला धडक दिली. अपघातात सहप्रवासी प्रतिमा यांना गंभीर दुखापत झाली. उपचारांपूर्वीच त्यांचा खासगी रुग्णालयात मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक राघू तपास करत आहेत.

---

#### किरकोळ कारणावरून हॉटेल व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला

**तळेगाव, ता. ९ :** तुम्ही माझ्या आईला उपसरपंचपदाच्या निवडणुकीत का पाडले? असे म्हणत हॉटेल व्यावसायिकावर धारदार कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. गुरुवारी पहाटे सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास कामशेत (ता. मावळ) परिसरात हि घटना घडली.

नीलेश मोहन दाभाडे (वय-४४, रा. कामशेत, ता. मावळ) असे हल्ला झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर ऋषिकेश सुरेश शिंदे (रा. भैरवनाथ मंदिराजवळ, कामशेत) असे मारहाण केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी दाभाडे यांनी कामशेत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संशयित फरार आहे. कामशेत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, कामशेत ग्रामपंचायतीची नुकतीच उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली होती. फिर्यादी नीलेश दाभाडे गुरुवारी पहाटे घरासमोर उभे असताना संशयित आरोपी ऋषिकेश शिंदे पहाटे दुचाकीवरून तेथे आला. यावेळी आरोपीच्या हातात लोखंडी, धारदार कोयता होता. यावेळी त्याने उपसरपंचपदाच्या निवडणुकीतील राजकीय वादातून माझ्या आईला उपसरपंचपदाच्या निवडणुकीत का पाडले, असा जाब विचारत नीलेश दाभाडे यांच्या डोक्यावर कोयत्याने वार केले.

---

# केशर रुग्णवाहिका आजपासून पूर्व हवेलीतील नागरिकांच्या सेवेत

**लोणी काळभोर, ता. ९ :** रुग्णवाहिका आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला त्वरित वैद्यकीय सेवा देऊन सुरक्षितपणे रुग्णालयात पोहोचवते. रुग्णवाहिका रुग्णांना जलद आणि सुरक्षितपणे नेते. त्यामुळे गंभीर आजारी किंवा अपघातात जखमी झालेल्या रुग्णाचा दवाखान्यात वेळेवर उपचार मिळतात. व रुग्णाचा जीव वाचतो. परंतु, ग्रामीण भागात रुग्णवाहिकांचा तुटवडा असल्याने अनेक रुग्णांची गैरसोय झाली आहे. ही गरज ओळखून नागरिकांच्या सेवेसाठी पूर्व हवेलीत उद्यापासून केशर रुग्णवाहिका दाखल होणार आहे.




कै. केशरबाई गोवर्धन दांडगे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त व त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि समाजसेवेचा वारसा जपण्यासाठी 'केशर ॲम्बुलन्स' सुरु करण्यात येत आहे. या सेवेचे उद्घाटन साधना सहकारी बँकेचे माजी चेअरमन सुभाष काळभोर व एसगीए ग्रुप ऑफ कंपनीचे सीईओ शंकर गायकवाड यांच्याहस्ते कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट टोलनाका येथे आज शनिवारी (ता. १०) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास होणार आहे.

उरुळी कांचन, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, कुंजीरवाडी, थेऊरसह परिसरातील रुग्णांना केशर रुग्णवाहिकेचा मोठा फायदा होणार आहे. या रुग्णवाहिकेत मेडीट्रान्स सर्व्हिसेस सेवा देण्यात येणार आहे. नागरिकांनी केशर रुग्णवाहिकेशी ९७६५७१९००७ / ९९२३४०८००० या फोन नंबरवर संपर्क साधावा. असे आवाहन केशर रुग्णवाहिकेचे संचालक जनार्दन दांडगे, लक्ष्मण दांडगे, वैजनाथ कदम व वैभव कदम यांनी केले आहे.

लोणी काळभोर ते उरुळी कांचन दरम्यान दररोज छोटे मोठे अपघातात होत असतात. अपघातात जखमी रुग्णाला वैद्यकीय मदत लवकर भेटली नाही तर त्याच्या जीव धोक्यात येऊ शकतो. तसेच इतर आजारांमध्ये रुग्णाला वेळेवर उपचार भेटले नाहीत तर त्याच्या जीवावरही बेतू शकते. त्यामुळे पूर्व हवेलीतील रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देण्यासाठी केशर रुग्णवाहिका ही वरदान ठरणार असून या सुविधेमुळे भविष्यात अनेक रुग्णाचे प्राण वाचणार आहेत.

---

# हिर्डोशी शाळेस संगणक, सीसीटीव्ही व वॉटर फिल्टरची भेट; शैक्षणिक उठावाला मोठे बळ

**इम्रान अत्तार**

भोर, ता. ९ : हिर्डोशी (ता. भोर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे, वॉटर फिल्टर, खेळाचे साहित्य तसेच शिवकालीन पुस्तके भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे शाळेतील शैक्षणिक सुविधांचा भक्कम पाया अधिक मजबूत झाला असून शैक्षणिक उठावाला मोठे बळ मिळाले आहे.



शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप धामुणसे, उपाध्यक्ष मीना धामुणसे, माजी अध्यक्ष अंकुश धामुणसे, सरपंच, उपसरपंच तसेच पालकांच्या सहकार्याने उद्योजक किरण गुजर, सुभाष शिर्के आणि ओक सर यांच्या वतीने ही मदत करण्यात आली.

विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, शाळेचे वातावरण सुरक्षित राहावे तसेच अभ्यासाबरोबरच पूरक ज्ञान व वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने ही शैक्षणिक साधने देण्यात आली. संगणकामुळे डिजिटल शिक्षणाला चालना मिळणार असून सीसीटीव्हीमुळे शाळेच्या सुरक्षिततेत भर पडणार आहे.

या प्रसंगी ग्रामस्थ व शाळेच्या वतीने मदत करणाऱ्या उद्योजकांचे आभार मानण्यात आले. शाळेत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांचा सन्मानही करण्यात आला. चालू शैक्षणिक वर्षात शाळेने दोन लाख रुपयांहून अधिक रकमेचा शैक्षणिक उठाव केल्याची माहिती मुख्याध्यापिका वैशाली वाबळे यांनी दिली. दुर्गम भागात असूनही हिर्डोशी शाळा शैक्षणिकदृष्ट्या सातत्याने प्रगती करत असून गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, या कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी (चाकण) संतोष कंक, सुनील भेलके, धोंडिबा मालुसरे, कोंडीबा धामुणसे, हनुमंत धामुणसे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य, मुख्याध्यापिका वैशाली वाबळे, पालकवर्ग, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# लोणी काळभोर येथील इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये गुणवत्ता संवर्धन अभियान संपन्न

**लोणी काळभोर, ता. ९ :** पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग पुणे, जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी काळभोर (ता. हवेली) येथील इंग्लिश मिडियम स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत नुकतीच तपासणी केली आहे.



मुख्याध्यापक संघाचे पथक प्रमुख सुरेश कांचन, गोविंद जाधव, सावंत मॅडम, श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे सहसचिव प्रशासन प्रा. सीताराम गवळी, सुरेश वाळेकर, सत्यवान जगताप व त्यांच्या सहकाऱ्यांनी इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेला भेट दिली. सर्व मान्यवरांना शाल व पुष्प देऊन प्राचार्या पौर्णिमा शेवाळे यांनी सत्कार केला.

पथकाने शाळेची सर्व पाहणी केली. शाळेने राबविलेले व आयोजित केलेले विविध उपक्रम, कामाच्या नोंदणी, अभिलेख, प्रत्यक्ष तपासले. पथकाने शाळेच्या कामाची नोंद वैशिष्ट्यपूर्ण घेतली. पथक प्रमुख सुरेश कांचन यांनी शाळेतील उपक्रमांचे कौतुक केले. तर गोविंद जाधव यांनी उपक्रमशील शाळा अशी भावना व्यक्त केली. शिक्षकांची धडपड व आत्मीयता पाहून सतत काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याचे प्रयत्न करत रहा असाही सल्ला त्यांनी दिला आहे. दरम्यान, हे अभियान यशस्वी करण्यासाठी शाळेच्या इन्चार्ज इनामदार, शेख, शितोळे, वैशाली काळभोर, टिळेकर व प्रियांका काळभोर या सर्व शिक्षिकांचे बहुमुल्य योगदान मिळाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या पौर्णिमा शेवाळे यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी शिंदे यांनी तर आभार प्रीती कदम यांनी मानले.

---

# वाहतूक विभागातील पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण नवगणे यांचा आयुक्तांकडून गुणगौरव

**लोणी काळभोर, ता. ९ :** वाहतूक कोंडी ही पुणे शहरातील एक गंभीर समस्या आहे. परंतु, या परिस्थितीतदेखील वाहतूक कोंडी सुरळीत ठेवून रस्त्यावरील सुरक्षा, सुव्यवस्था राखण्यासाठी वाहतूक विभागातील एका पोलीस उपनिरीक्षकाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन पुणे शहर पोलीस आयुक्तांनी गौरव केला आहे.



महाराष्ट्र पोलीस दलाचा २ जानेवारी स्थापना दिवस सप्ताह स्वरूपात साजरा करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने परिमंडळ ६ अंतर्गत मुद्देमाल वितरण समारंभ गुरुवारी (८ जानेवारी) विमाननगर येथील सिम्बायोसिस स्कूल ऑफ इंटरनॅशनलच्या सभागृहात पार पडला. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते वाहतूक विभागातील पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण नवगणे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पुणे शहर पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील व पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त हेमंत जाधव, निखील पिंगळे, सोमई मुंडे यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण नवगणे हे मागील ३२ वर्षापासून पोलीस दलात कार्यरत आहे. सध्या ते पुणे शहर वाहतूक विभागात काम करत आहेत. नवगणे यांनी वाहतूक शिस्त, नियोजन आणि नागरिका भिमुख कामकाजात ठोस योगदान दिल्याने त्यांच्या कार्याची वरिष्ठ स्तरावर दखल घेण्यात आली आहे. लक्ष्मण नवगणे यांच्या या सन्मानामुळे वाहतूक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

#### अल्पवयीन मुलांकडून पाच दुचाकी जप्त

**पिंपरी, ता. ९ :** गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने दीडशेहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी करून वाहन चोरी करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून वाहन चोरीचे पाच गुन्हे उघडकीस आले असून पाच दुचाकी जप्त केल्या आहेत.

या अल्पवयीन मुलांकडे अधिक चौकशी केली असता पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर, संत तुकारामनगर, एमआयडीसी भोसरी, चिंचवड तसेच खोपोली रेल्वे स्थानक परिसरातून दुचाकी चोरल्याचे सांगितले.

त्यांच्याकडून दोन लाख ९० हजार रुपये किमतीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या. या कारवाईत संत तुकारामनगर पोलिस ठाण्यातील दोन तसेच एमआयडीसी भोसरी, चिंचवड व खोपोली पोलिस ठाण्यातील प्रत्येकी एक असे एकूण पाच गुन्हे उघडकीस आले आहेत.

# ‘अजित पवार केजीएफमधील रॉकी भाई’; रोहित पवारांकडून जाहिरसभेत काकांचं कौतुक

## लांडगे-जगतापांची तुलना ‘गरुडा’ पात्राशी

**पुणे, ता. ८ :** पक्षफुटीनंतर पहिल्यांदाच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे आमदार रोहित पवार एकाच राजकीय व्यासपीठावर दिसले. पिंपरी-चिंचवडमधील सांगवी येथे झालेल्या प्रचार सभेमुळे हा योग जुळून आला आणि राजकीय वर्तुळात याची जोरदार चर्चा रंगली.

पिंपरी-चिंचवडमध्ये यावेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र येऊन निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे अजित पवार गटाचे आणि शरद पवार गटाचे नेते-कार्यकर्ते एकमेकांच्या उमेदवारांसाठी प्रचार करताना दिसत आहेत. येत्या काही दिवसांत खासदार सुप्रिया सुळेही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ चिन्ह) उमेदवारांच्या प्रचारात प्रत्यक्ष मैदानात उतरणार असल्याची माहिती आहे. राजकारणात कायमचे शत्रू किंवा मित्र नसतात, हे चित्र सध्या स्पष्टपणे दिसत आहे. या सभेत अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कथित भ्रष्टाचारावर जोरदार हल्ला चढवला. काही स्थानिक नेत्यांवर थेट आरोप करत गुंडगिरी, दादागिरी चालू देणार नाही, अशा शब्दांत त्यांनी इशाराही दिला.

दरम्यान, रोहित पवार यांनी आपल्या भाषणात केजीएफ चित्रपटाचा दाखला देत अजित पवारांना पिंपरी-चिंचवडकरांसाठी रॉकी भाई अशी उपमा दिली. तर भाजप आमदार महेश लांडगे आणि शंकर जगताप यांची तुलना त्यांनी केजीएफमधील गरुडा या पात्राशी केली.

रोहित पवार म्हणाले, पिंपरी-चिंचवडमध्ये स्थानिक नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहे. भाजपला सत्तेबाहेर काढण्यासाठीच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले आहेत. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळे हा निर्णय घेण्यात आला. यावेळी त्यांनी परिवारावरही सूचक भाष्य केलं. हिंदू संस्कृतीत कुटुंबाला खूप महत्त्व आहे. परिवार एकत्र राहावा, ही आपली परंपरा आहे, असं म्हणत त्यांनी पवार कुटुंबाच्या एकत्र येण्याकडे इशारा केला.

ते पुढे म्हणाले, अजित पवारांनी स्पष्ट केलं आहे की ही निवडणूक आपण एकत्र लढतोय. पुढे महापालिकेनंतर जिल्हा परिषद निवडणुका आल्यावरही स्थानिक कार्यकर्त्यांची इच्छा असेल, तर एकत्र लढण्यात अडचण नाही.

पवार कुटुंब एकत्र राहावं, ही माझीही इच्छा आहे. राजकारणात काहीच कायमस्वरूपी नसतं. आज आपण एकत्र आलो, ही सकारात्मक बाब आहे. उद्या काय होईल, हे सांगता येत नाही, असंही रोहित पवार यांनी स्पष्ट केलं. महेश लांडगे यांच्या टीकेवर बोलताना रोहित पवार म्हणाले, महेश लांडगे काय बोलतात याकडे मी लक्ष देत नाही. स्थानिक लोक त्यांना भ्रष्टाचारात अडकलेला बोका म्हणतात.

भाजप आमदार शंकर जगताप यांच्यावरही त्यांनी आरोपांची झोड उठवली. केजीएफमधील गरुडाप्रमाणे पिंपरी-चिंचवडमध्ये छोटे -मोठे कॉन्ट्रॅक्ट, कामं यांवर नियंत्रण ठेवलं जात आहे. रिंग करून पैसे कमावण्याचे प्रकार सुरू आहेत, असा आरोप त्यांनी केला. या दोघांना वाटतं की पिंपरी-चिंचवड ही त्यांची जहागिरी आहे. पण चित्रपटातील रॉकीप्रमाणे अजित दादा या गुंडगिरी आणि कॉन्ट्रॅक्ट राजवटीविरोधात लढत आहेत, असा दावा रोहित पवार यांनी केला.

एमसीए प्रकरणावर बोलताना त्यांनी सांगितलं की, एमसीएमध्ये कोणतेही बेकायदेशीर किंवा गैरप्रकार झालेले नाहीत. प्रकरण न्यायालयात असून सर्व काही कायदेशीर मार्गाने सुरू आहे. विरोधकांनी राजकीय हेतूने कोर्टात धाव घेतली आहे. एखाद्या संस्थेत परिवारातील दहा-वीस लोक असणं गैर नाही. सगळे उच्चशिक्षित आहेत. ४ फेब्रुवारीला न्याय मिळेल, असा मला विश्वास आहे, असंही त्यांनी नमूद केलं. केदार जाधव यांच्याबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले, केदार जाधव चांगले खेळाडू आहेत. मात्र त्यांचा वापर फक्त चेहरा म्हणून केला जात आहे. एमसीएचा लोगो बदलल्यामुळे काही संघटना आणि विचारधारेतील लोक दुखावले गेले आहेत. केदार जाधव यांच्या पाठीमागे भाजपची मोठी ताकद उभी आहे, असा आरोपही त्यांनी केला.

## संक्षिप्त



### भाजपकडून तब्बल २६ बंडखोरांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**पुणे, ता. ९ :** राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होत असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. एकीकडे प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे राजकीय पक्षातील अंतर्गत विरोध आणि पक्षातील बंडखोरी हि उच्च पदस्थ नेत्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. अशातच या बंडखोरांवर मुंबई भाजपकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. भाजपने बंडखोरी करणाऱ्यांचं थेट निलंबन करत कारवाईचा बडगा उगारलाय. मुंबई महापालिकेत अपक्ष उमेदवारी करत बंडखोरी केलेल्यांचे पक्षश्रेष्ठींकडून निलंबन करण्यात आलंय. मुंबई भाजपकडून जवळ जवळ २६ जणांचे ६ वर्षांसाठी निलंबन करण्यात आल्याची माहिती आहे. महापालिका निवडणुकीत पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत हि निलंबनाची कारवाई करण्यात आलीय.

### भाजपमधील अंतर्गत असंतोष समोर; चंद्रपुरात बावनकुळेंच्या सभेतच मोठा गोंधळ

**चंद्रपूर, ता. ९ :** महापालिका निवडणुकीच्या प्रचारात भाजपमधील अंतर्गत असंतोष चंद्रपूरमध्ये उघडपणे समोर आला. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचारसभांदरम्यान तिकीट नाकारलेल्या इच्छुकांनी दोन ठिकाणी थेट हस्तक्षेप केल्याने सभास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या घटनांमुळे भाजपमधील नाराजी अजूनही धगधगत असल्याचे स्पष्ट झाले. सपना टॉकीज चौकातील सभेत भाजपकडून तिकीट नाकारलेले राकेश बोमनवार हे बावनकुळे यांचे भाषण सुरू असतानाच मला साहेबांशी बोलायचे आहे म्हणत थेट व्यासपीठावर पोहोचले. अचानक घडलेल्या प्रकारामुळे क्षणभर गोंधळ उडाला. बावनकुळे यांनी प्रसंगावधान राखत भाषण थांबवले आणि विनोदी टिप्पणी करत वेळ मारून नेली. मात्र, बोमनवार व्यासपीठावरून खाली उतरण्यास तयार नसल्याने आमदार किशोर जोरगेवार यांनी त्यांना खाली जाण्याचे सांगितले. अखेर कार्यकर्त्यांनी हस्तक्षेप करत बोमनवार यांना सभास्थळाबाहेर नेले. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री डॉ. अशोक उईके व भाजप उमेदवार उपस्थित होते. उमेदवारीवरून सुरू झालेला भाजपतील नाराजीचा सूर आता प्रचारकाळातही कायम असल्यामुळे नेते चिंतित असल्याचे चित्र बघायला मिळाले.

### एका भ्रष्टाचारी माणसाच्या हातात सगळा कारभार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पिंपरी, ता. ९ :** पिंपरी चिंचवड शहरात इतर तीन आमदार आहेत. शंकर जगताप तुलनेने लहान असल्याने बोलत नाही. विधान परिषदेच्या दोन आमदारांना बोलण्याचे स्वातंत्र्य नाही. त्यामुळे शहरामध्ये एका भ्रष्टाचारी माणसाच्या हातात सगळा कारभार गेला आहे. त्यामुळे तुम्हीही खा आणि मी ही खातो असं म्हणत शहराचं वाटोळं केल्याचा घणाघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. तसंच जे आज माझ्यावर टीका करत आहेत, तो किती पात्रतेचा आहे, हे पाहूनच टीका मनावर किती घ्यायची हे ठरवले पाहिजे. काही जण सुपारीबाज आहेत, त्यांना महत्त्व देण्याची गरज नाही असंही त्यांनी म्हटलंय.

### महापालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी

**पुणे, ता. ९ :** मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित महापालिका क्षेत्रात त्यादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महापालिकांमध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

### नियम पाळा नाहीतर अमेरिकेतून हकालपट्टी

**मुंबई, ता. ९ :** अमेरिकेतील कायदे, नियमांचे काटेकोर पालन करा. यात थोडी जरी चूक झाली तरी व्हिसा रद्द करून तुमची हकालपट्टी केली जाऊ शकते. हिंदुस्थानात परत पाठविले जाईल, असा थेट इशारा अमेरिकेने हिंदुस्थानी विद्यार्थ्यांना दिला आहे. विशेष म्हणजे दिल्लीतील अमेरिकन दूतावासाने एक्सवर पोस्ट करत ही धमकी दिली आहे. त्यामुळे अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या हजारो हिंदुस्थानी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सरकारी रुग्णालयात आता मिळणार दर्जेदार उपचार; बेशिस्त कारभाराला घालणार लगाम

**पुणे, ता. ९ :** पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यातील सरकारी आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी आरोग्य विभागाने आता कडक पाऊल उचलले आहे. सरकारी रुग्णालयांचे कामकाज व्यवस्थित चालते की नाही, हे पाहण्यासाठी विशेष भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही पथके प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक भेटी देतील. यामुळे रुग्णालयातील बेशिस्त कारभाराला लगाम बसेल आणि सर्वसामान्यांना मिळणाऱ्या आरोग्य सेवेचा दर्जा सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या मोहिमेसाठी पुणे परिमंडळ स्तरावर २ आणि जिल्हा स्तरावर ४ विशेष पथके तयार केली आहेत. पहिल्या पथकात डॉ. भगवान पवार आणि डॉ. आरिफ सय्यद यांच्यासह इतर तज्ज्ञांचा समावेश आहे, तर दुसऱ्या पथकाची जबाबदारी डॉ. श्रीनिवास कोलोड यांच्याकडे आहे. पुण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यम्पल्ले आणि डॉ. रामचंद्र हंकारे यांच्या नेतृत्वाखाली पथके काम करतील. ही पथके केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन वस्तुस्थिती जाणून घेणार आहेत.

तपासणी दरम्यान पथके प्रामुख्याने रुग्णालयातील स्वच्छता, औषधांचा साठा आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती यावर लक्ष देतील. कर्मचारी गणवेशात आहेत का, रुग्णांना वेळेवर उपचार मिळतात का आणि औषधे कालबाह्य झाली आहेत का, याची सखोल चौकशी केली जाईल. रुग्णालयातील त्रुटी शोधून त्या त्वरित दूर करणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

सरकारी रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला दर्जेदार सेवा मिळणे आवश्यक आहे. या भरारी पथकांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त येईल आणि औषध व्यवस्थापन अधिक पारदर्शक होईल. पुणे, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांत ही मोहीम राबवली जात असून, यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार आहे.

## जिल्हा परिषद निवडणुका एप्रिलमध्ये?

**नागपूर, ता. ९ :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समि त्यांच्या निवडणुकांची वाट पाहणाऱ्या म तदारांसाठी एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुका आटोपल्यानंतर आता महानगरपालिकांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली असली, तरी जिल्हा परिषदांचा मुहूर्त मात्र लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत, तरीही काही तांत्रिक कारणांमुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यापर्यंत पुढे ढकलल्या जाऊ शकतात.



निवडणुका लांबणीमागे मोठी कारणे आहेत. राज्यातील दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा पार पडणार आहेत. या काळात संपूर्ण सरकारी यंत्रणा आणि शाळा परीक्षांच्या नियोजनात व्यस्त असल्याने मतदान प्रक्रिया राबवणे कठीण होणार आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे आरक्षणाची गुंतागुंत ही आहे. काही जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे. या वाढीव आरक्षणाच्या मुद्द्यावर २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी होणार असून, त्यानंतरच निवडणूक आयोग आपला अंतिम निर्णय घेणार आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये आरक्षणाचा कोणताही वाद नाही, तिथे १० ते १५ जानेवारीच्या सुमारास आचारसंहिता लागू होऊन फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात मतदान घेतले जाऊ शकते. न्यायालयाच्या निकालानंतर आणि बोर्डाच्या परीक्षा संपल्यानंतरच खऱ्या अर्थाने जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा बिगुल वाजेल, असे सध्याचे चित्र दिसत आहे.

# मकरसंक्रांतीच्या अगोदर महिलांच्या बँक खात्यावर ३ हजार जमा होणार

**नाशिक, ता. ९ :** विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. या योजनेतून लाभार्थी महिलांना दर महिन्याला १५०० रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीतील प्रचारात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा मुद्दा गाजला. त्यानंतर आता राज्यातील २९ महापालिका निवडणुकीतही या योजनेवर सातत्याने महायुतीमधील नेत्यांकडून बोलले जात आहे.



या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी महिलांसाना दोन महिन्याचे हप्ते एकत्र मिळणार आहेत. नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता एकत्र येणार होता. परंतु फक्त १५०० रुपये लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा झाले. त्यामुळे त्यांची निराश झाली. आता दिलासादायक बातमी समोर आली आहे. महिलांच्या बँक खात्यावर एकत्र हजार रुपये जमा होणार आहेत. याबाबतची घोषणा भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी केली आहे.

देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मिळणार.. मकर संक्रांतीची मोठी भेट! १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे तीन हजार रुपये जमा होणार! असे ट्वीट करत मंत्री गिरीश महाजन यांनी माहिती दिली आहे. याचसोबत एक पोस्टरदेखील शेअर केले आहे. ज्यामध्ये देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीची मोठी भेट, असे लिहिले आहे. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.

## मतदानासाठी १२ पैकी एक पुरावा आवश्यक

**पुणे, ता. ९ :** राज्यातील एकूण २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान पार पडणार आहे. मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येतो, परंतु मतदान केंद्रावर गेल्यानंतर मतदाराकडे ओळखीचा पुरावा आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या यादीनुसार, एकूण १२ पुराव्यांपैकी एक कोणताही पुरावा असल्यास मतदार राजाला मतदान करता येते. भारताचा पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य शासनाचे फोटो ओळखपत्र, राष्ट्रीयीकृत बँकांचे पासबुक, फोटोसहित अपंगत्वाचा दाखला, मनरेगाचे जॉब कार्ड ओळखपत्र, निवृत्ती कर्मचाऱ्यांचे पासबुक, शासकीय सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्यसैनिकाचे ओळखपत्र, आरोग्य विमा योजनेचे फोटोसह कार्ड द्वारे मतदान करता येते.

## शेळ्या-बोकड चोरणारी टोळी जेरबंद; १३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बारामती, ता. ९ :** बारामती तालुक्यातील शेळ्या आणि बोकड चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात वडगाव निंबाळकर पोलिसांना मोठे यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी १२ लाख ९५ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून यामध्ये ३२ शेळ्या आणि बोकडांचा समावेश आहे. पोलिसांनी सातारा जिल्ह्यातील अशोक बाबुराव जाधव याला अटक केली असून त्याचे दोन साथीदार सध्या फरार आहेत. पकडण्यात आलेल्या आरोपीवर यापूर्वीही अनेक पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे दाखल आहेत.




पोलिसांनी चोरट्यांच्या पिकअप वाहनातून तलवारी, कोयते, कटर आणि इतर घातक शस्त्रे जप्त केली आहेत. ही टोळी रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांच्या गोठ्यातील लोखंडी जाळ्या तोडून जनावरांची चोरी करत होते. सदोबाचीवाडी येथील चोरीच्या प्रकरणात तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी अजय होळकर, आर्यन माने आणि बंटी घोडके यांना अटक केली असून त्यांच्याकडून दोन दुचाकी आणि चोरी केलेले बोकड जप्त केले आहेत. न्यायालयाने या आरोपींना २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, वाघळवाडी परिसरातही या टोळीने शेळ्या चोरण्याचा प्रयत्न केला होता, ज्याचा तपास आता अंतिम टप्प्यात आहे. पोलीस हवालदार पोपट नाळे आणि त्यांच्या पथकाने ही महत्त्वाची कारवाई केली असून जप्त केलेल्या शेळ्या संबंधित शेतकऱ्यांना परत करण्यात आल्या आहेत.

# राज्यकर्त्यांचे प्रेम राज्यावर हवे, सत्तेवर नव्हे : ठाकरे बंधूंची टीका

**मुंबई, ता. ९ :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संयुक्त मुलाखतीत सत्ताधाऱ्यांवर आणि विशेषत: भाजपवर घणाघाती टीकास्त्र सोडले. राज्यकर्त्यांचे प्रेम राज्यावर हवे; सत्तेवर नव्हे. राज्यात राज्यकर्ते मराठी असतील; पण त्यांचे मालक दिल्लीत बसून मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम करत आहेत. आम्ही हे कारस्थान उधळून लावू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच, महाराष्ट्र राज्य म्हणजे क्लीन चिट देणारी फॅक्टरी बनली आहे, असा आरोपही त्यांनी केला.




ठाकरेसेनेचे नेते संजय राऊत आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी ठाकरेबंधूंची एकत्रित मुलाखत घेतली. त्यावेळी ठाकरेबंधूंनी विविध प्रश्नांवर रोखठोक उत्तरे देत केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांवर जोरदार शाब्दिक तोफ डागली. संबंधित मुलाखतीचा पूर्वार्ध गुरूवारी ठाकरेसेनेचे मुखपत्र असणाऱ्या दैनिकात प्रसिद्ध झाला. राज्यकर्ते फक्त ठेकेदारांसाठीच काम करत आहेत.

राज्य संपले तरी चालेल; पण ठेकेदारांसाठी सत्ता राबवली जातेय, अशी टीका उद्धव यांनी केली. राजकारणात युत्या अन् आघाड्या होतात. त्या प्रसंगी तुटतात. पुन्हा पक्ष एकत्र येऊ शकतात. पण, पक्ष संपवणं हा कुठला प्रयोग? महाराष्ट्र दुबळा करण्यासाठीच शिवसेना तोडण्यास आली, असा दावाही त्यांनी केला. मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळी करणं हे काहींचं जुनं स्वप्न आहे. ते कसं पूर्ण करता येईल यासाठी खटाटोप सुरू आहे.

मुंबई वेगळी करण्याची इच्छा असणारे केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आहेत. महानगरपालिकांमध्येही तेच सत्तेवर आले तर मराठी माणूस काहीच करू शकणार नाही, असा इशारा राज यांनी दिला. मराठी माणसाच्या अस्तित्वाची लढाई विचारात घेऊन आम्ही एकत्र आलो. मराठी माणसानेही एक व्हायला हवे, असे आवाहनही ठाकरेबंधूंनी केले.

# भाजप स्वत:च काँग्रेसयुक्त झाली; हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

**जालना, ता. ०९ :** अंबरनाथ आणि अकोटमधील घडामोडींमुळे भाजप पक्षाचे दुटप्पी धोरण जनतेसमोर उघड झाले आहे. यामुळे हे स्पष्ट होते की ते सत्तेसाठी आपल्या तत्त्वांशी तडजोड करू शकतात. देशाला काँग्रेसमुक्त करण्याच्या प्रयत्नात भाजप स्वत:च काँग्रेसयुक्त झाला आहे, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगाविला.



हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, अंबरनाथमधील काँग्रेसच्या नगरसेवकांनी पक्ष नेतृत्वाला न विचारता भाजप-प्रणित आघाडीत सामील होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले. काँग्रेसने कठोर कारवाई केली. परंतु भाजपने या नगरसेवकांना आपल्या पक्षात घेत स्वागत केले. यावरून भाजपच्या बोलणी आणि करणीतील फरक दिसतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणतीही कारवाई केली नाही आणि केवळ एक विधान केले, अशा शब्दांत त्यांनी निशाणा साधला.

भाजप सत्तेसाठी ओवैसींच्या एआयएमआयएमसोबतही हातमिळवणी करण्यास तयार आहे. हे पक्षाच्या नैतिक अध: पतनाचे प्रतिबिंब आहे. सत्ताधारी पक्षाचे अनेक उमेदवार राज्यभरात लोकप्रियतेमुळे नव्हे, तर दबाव, धमक्या आणि पैशांच्या जोरावर बिनविरोध निवडून येत आहेत, असा आरोप त्यांनी केला. तसेच अशा प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासन आणि निवडणूक यंत्रणाही सत्ताधारी पक्षाला मदत करत असल्याचे दिसत आहे. ही बिनविरोध निवडणुकांची प्रवृत्ती लोकशाही आणि संविधानासाठी गंभीर धोका असल्याचे त्यांनी म्हटले.

## महापालिकेकडून मतमोजणी केंद्रांची यादी जाहीर

**पुणे, ता. ९ :** महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदार होणार असून त्यानंतर लगेच १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. या मतमोजणी केंद्राची अखेर महापालिकेने घोषणा केली आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय नियोजन केले असून संबंधित प्रभागांतील क्रीडा संकुले, शाळा, महाविद्यालये तसेच सांस्कृतिक केंद्रांमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडेल. मतदानानंतर सर्व मतपेट्या मतमोजणीच्या ठिकाणी उभारलेल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहेत. महापालिकेचे उपायुक्त अरविंद माळी यांनी ही माहिती दिली. मतमोजणी केंद्रांमध्ये बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय, सिंहगड रस्ता, कसबा विश्राम बागवाडायासह शहरातील १२ क्षेत्रीय कार्यालयांचा समावेश असल्याचंही माळी यांनी यावेळी म्हटलं

# कांद्याचे दर पुन्हा गडगडले; शेतकऱ्यांना मोठा फटका

**लासलगाव, ता. ९ :** आशिया खंडातील कांद्याची अग्रेसर बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाली असून, कांदा उत्पादक शेतक-यांचे सुमारे २०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत कांद्याच्या दरात सुमारे ६०० रुपयांची घसरण झाली असून, मागील पंधरा दिवसांत तब्बल १ हजार रुपयांनी बाजारभाव खाली आले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.



लासलगावसह देशातील विविध कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने बाजारात दरांवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. त्यातच बांगलादेशातील सुरू असलेल्या हिंसाचारामुळे भारतातून होणारी कांदा निर्यात मर्यादित प्रमाणातच सुरू असल्याने निर्यातीवर विपरीत परिणाम झाला आहे.

तसेच अरब देशांच्या बाजारपेठां मध्ये चीन आणि पाकिस्तानचा कांदा कमी दरात उपलब्ध होत असल्याने भारतीय कांद्याला अपेक्षित मागणी मिळत नसल्याचे चित्र आहे. या सर्व परिस्थितीचा फटका थेट भारतीय शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर बसत असून, एकट्या नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे गेल्या पंधरा दिवसांत अंदाजे १७५ ते २०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# तू आमचा कार्यक्रम करणार, मग आम्ही काय बांगड्या घातल्यात का?

## पैलवान महेश लांडगेंचा अजित पवारांवर एकेरी भाषेत हल्लाबोल

**पिंपरी, ता. ९ :** भाजपचे आमदार महेश लांडगे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील वाद पुन्हा एकदा चांगलाच चिघळताना दिसत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोघांमधील आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत. अजित पवार हे महाराष्ट्राचे आका आहेत, अशी जहरी टीका महेश लांडगेंनी केली होती. त्यावर अजित पवारांनी चार शब्दांत विषय संपवला होता. मात्र त्यानंतर पुन्हा एकदा लांडगेंनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७० हजार कोटींच्या घोटाळ्यावर भाष्य केल्यानंतर संध्याकाळी संबंधित व्यक्ती भाजपमध्ये दाखल झाल्याचा उल्लेख करत महेश लांडगेंनी थेट अजित पवारांवर टीका केली. देवा भाऊंनी इशारा दिल्यावर आपले घोटाळे काढणारे सुद्धा जमा होतात, असे म्हणत लांडगेंनी अजित पवारांवर एकेरी भाषेत आरोप केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी महेश लांडगेंचा भ्रष्टाचाराचा आका असा उल्लेख केला होता. यावर संतप्त झालेल्या लांडगेंनी तू आमचा कार्यक्रम करणार म्हणतोस, मग आम्ही काय बांगड्या घातल्या आहेत का, असा सवाल केला. आमच्या नादी लागू नको, आमच्या लाडक्या बहिणी तुझा कार्यक्रम करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

महेश लांडगे यांनी पुन्हा एकदा अजित पवार हे महाराष्ट्राचे आका असल्याची टीका केली. स्वतः चा भ्रष्टाचार लपवण्यासाठी तुम्ही भाजपमध्ये आला आहात, आधी स्वतःच्या मुलाचे पराक्रम पाहा, असेही त्यांनी म्हटले. जे स्वतःच्या काकांचे होऊ शकले नाहीत, ते पिंपरी-चिंचवडचे काय होणार, असा सवालही लांडगेंनी उपस्थित केला.

दरम्यान, या टीकेला उत्तर देताना अजित पवार म्हणाले की, मी कोण आहे हे जनता ठरवेल. १५ तारखेपर्यंत वेळ काढा, उत्तर देतो. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील खड्डे, कचरा, वाहतूक कोंडी, पाणीटंचाई आणि गुन्हेगारी हे खरे अलार्म आहेत, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. पालिकेत मोजक्याच लोकांना टेंडर दिले जात असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# मौजमजेसाठी चोरी करणारी सराईत टोळी पारगाव पोलिसांच्या जाळ्यात; २७ दुचाकी जप्त

**आंबेगाव, ता. ९ :** मौजमजेसाठी मोटरसायकल चोरी करणाऱ्या सराईत टोळीला पारगाव पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी २७ चोरीच्या मोटरसायकली जप्त केल्या असून एकूण १६ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. पारगाव पोलीस ठाण्याच्या या कारवाईचे परिसरात कौतुक होत आहे.

पोलिसांनी सापळा रचून रितेश फकीरा रोकडे (वय-१८, रा. चांडोह, ता. शिरूर), हर्षद जालिंदर ढवळे (वय-२१, रा. फाकटे, ता. शिरूर) आणि प्रथमेश दत्तात्रय ढवळे (वय-१९, रा. फाकटे, ता. शिरूर) यांना अटक केली. आरोपींकडून विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या २७ मोटरसायकली



हस्तगत करण्यात आल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ डिसेंबर २०२५ रोजी जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथून ॲक्टिव्हा दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार पारगाव पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने तपास सुरू करत पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान पुणे, अहिल्यानगर आणि जळगाव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमधील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले.

दरम्यान, पारगाव पोलिसांनी मागील वर्षभरात मंदिर चोरी व मोबाईल चोरीचेही अनेक गुन्हे उघडकीस आणले आहेत. ७ ऑगस्ट २०२४ रोजी शिरूर, आंबेगाव, खेड आणि रांजणगाव परिसरातील मंदिरांत झालेल्या चोरीप्रकरणी गुन्हेगारांना अटक करून सुमारे ४ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल संबंधित मंदिरांच्या ताब्यात देण्यात आला होता. तसेच २०२५ मध्ये हरवलेल्या मोबाईल प्रकरणात २५ मोबाईलचा शोध घेऊन सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे तसेच पोलीस कर्मचारी संजय साळवे, मंगेश अभंग, चंद्रकांत गव्हाणे आणि अविनाश कालेकर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# दौंड राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून आंतरजिल्हा बनावट दारू तस्करीचा पर्दाफाश

## ३ जणांना अटक तर २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दौंड, ता. ९ :** बनावट देशी दारूची वाहतूक व विक्रीचा पर्दाफाश करण्यास दौंड राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथक क्रमांक २ ला यश आले आहे. पथकाने राजेगाव (ता. दौंड) हद्दीत सापळा रचून ३ जणांना अटक केली आहे तर दोन महागड्या वाहनांसह सुमारे ३० लाख ८५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

उमेश हरिश्चंद्र सुरवसे (वय २३, रा. सोनाळवाडी), सुयोग नाना जंजिरे (वय २६, रा. पिंपळवाडी) व राहुल पांडुरंग सुपेकर (वय ३०, रा. कुळधरण. जि. अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पथक




पेट्रोलिंग करत असताना, राजेगाव (ता. दौंड) हद्दीतून बनावट दारूची वाहतूक होणार आहे. अशी माहिती एका खबऱ्यामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पथकाने राजेगाव-भिगवण रोडवर सापळा रचला. यावेळी एका मारुती स्विफ्ट कारमधून संशयास्पद रित्या वाहतूक होताना आढळली. पथकाने वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये 'टँगो पंच' देशी दारूच्या १५०० बनावट बाटल्या आढळून आल्या. याप्रकरणी चालक उमेश सुरवसे आणि सुयोग जंजिरे यांना ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, आरोपींना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, आरोपींनी हा माल अहिल्यानगर जिल्ह्यातील कुळधरण येथून आणल्याची कबुली दिली. त्यानंतर पथकाने तातडीने कुळधरण (ता. कर्जत) येथे धाव घेतली. येथील आरोपी राहुल सुपेकर याच्या घरासमोर उभ्या असलेल्या हुंडाई क्रेटा गाडीत देशी दारूच्या १३०० बनावट बाटल्या आढळून आल्या. तसेच पुढे 'हॉटेल सागर ढाबा' येथे छापा टाकून आणखी दारूचा साठा जप्त केला आहे. तर मुख्य सूत्रधार मुरलीधर सायकर आणि अमोल दानवले हे फरार झाले असून पोलिसांचे एक पथक आरोपींचा शोध घेत आहे. सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे निरीक्षक विजय रोकडे, दुय्यम निरीक्षक प्रदीप झुंजरुक, मयुर गाडे, दिनेश ठाकूर, जवान, दत्तात्रय साळुंके, संकेत वाजे, सौरभ देवकर,सोपान टोंपे, गोपाल कानडे, शुभम भोईटे व केशव वामने यांच्या पथकाने केली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## कोणत्या भाज्या कच्च्या खायला हव्यात, जाणून घ्या

**पुणे, ता. ९ :** आपण अन्न शिजवून खातो. परंतु काही अन्नपदार्थ असे आहेत की, ते कच्चे खाणे आरोग्यासाठी चांगले मानले जातात. यात अनेक पोषणमूल्य असल्यामुळे काही अन्नपदार्थ हे कच्चेच खायला हवेत. कच्चा कांदा अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतो. तो शिजवल्याने कर्करोगापासून संरक्षण करणारे फायटोकेमिकल्स कमी होतात. कच्चे कांदे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्ताच्या गुठळ्या रोखण्यास मदत करू शकतात. ते कर्करोगाच्या पेशी तयार होण्यास देखील मदत करते.

काकडी शिजवल्याने तिची चव खराब होत नाही तर, त्यातील पोषक घटक देखील कमी होतात. कच्ची काकडी शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते.

कच्च्या ब्रोकोलीमध्ये अनेक आवश्यक जीवनसत्त्वे आणि फायबर असतात. जास्त शिजवल्याने त्याचे पोषक घटक नष्ट होऊ शकतात.

लसणात असलेले सल्फर संयुगे आणि अँटीऑक्सिडंट्स आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. स्वयंपाक केल्याने हे घटक नष्ट होतात. म्हणून ते कच्चे किंवा हलक्या कुस्करून खाणे चांगले.

टोमॅटो कच्चे आणि शिजवलेले दोन्हीही फायदेशीर आहेत. कच्चे टोमॅटो व्हिटॅमिन सी ने समृद्ध असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. त्यांना जास्त शिजवल्याने हा फायदा कमी होऊ शकतो.

गाजर हे फायबर आणि जीवनसत्त्वांचा चांगला स्रोत आहेत. ते शिजवल्याने काही पोषक तत्वे कमी होतात. दररोज सॅलडमध्ये कच्चे गाजर खाणे पचनासाठी फायदेशीर आहे.

पालक यासारख्या हिरव्या पालेभाज्या कच्च्या खाल्ल्यास जास्त व्हिटॅमिन सी आणि ई मिळते. जास्त उष्णता या पोषक तत्वांना नुकसान करू शकते.

दरम्यान, बीट कच्चे खाल्ल्याने त्याच्या फोलेट आणि अँटीऑक्सिडंट्सचे पूर्ण फायदे मिळतात. शिजवल्याने त्याचे गुणधर्म कमी होतात, म्हणून ते सॅलडच्या माध्यमातून कच्चे खाणे अधिक उत्तम मानले जाते.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात रंगणार राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेचा थरार

### आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट २३ जानेवारीपासून; ऑलिंपियन मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांची उपस्थिती

**पुणे, ता. ९ :** एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट (व्हीएसएम२०२६) या वर्षातील सर्वात मोठ्या राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन-आंतरविद्यापीठीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा आठवा हंगाम २३ ते २८ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात पार पडणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ रोजी पद्मश्री, अर्जुन पुरस्कार व ऑलिंपिक कांस्यपदक विजेते मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे (एनएसएनआयएस) उपमहासंचालक व वरिष्ठ कार्यकारी संचालक विनित कुमार, मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड तसेच डॉ. सुनीता कराड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ बुधवार, २८ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात होणार आहे. या समारंभात पद्मश्री व अर्जुन पुरस्कारप्राप्त तसेच रोईंगमध्ये




आशियाई सुवर्णपदक विजेते कॅप्टन बजरंग लाल ताखर (व्हीएसएम) यांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार असून, ऑलिंपियन व अर्जुन पुरस्कार विजेते जलतरणपटू विरधवल खाडे तसेच मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त रोवर स्मिता शिरोळे-यादव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणेतून व प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या पुढाकाराने देशातील विद्यापीठांमधील विद्यार्थ्यां मध्ये क्रीडा संस्कृती रुजावी तसेच विविध क्रीडाप्रकारांतून प्रतिभावान खेळाडू घडावेत, या उद्देशाने विश्वनाथ स्पोर्ट मिटची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून सक्षम क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून देत राज्यासह देशाच्या क्रीडा संस्कृतीत मोलाची भर घालणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या स्पर्धेत क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कबड्डी, टेनिस, टेबल-टेनिस, खो-खो, वॉटर पोलो, चेस, जलतरण, इनडोअर रोईंग, बॉक्सिंग, तिरंदाजी या खेळांमध्ये सहभागी क्रीडापटूंमध्ये विजयासाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील १५०+ एकरांच्या प्रशस्त व अत्याधुनिक क्रीडा सुविधांनी सुसज्ज कॅम्पसमध्ये खेळाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणी या ब्रीदवाक्यासह आयोजित व्हीएसएम८ मध्ये आतापर्यंत १३५ हून अधिक शैक्षणिक संस्था/विद्यापीठांमधील ५ हजारांहून अधिक खेळाडूंनी १५ क्रीडा प्रकारांसाठी नावनोंदणी केली आहे. स्पर्धेच्या कालावधीत पाच दिवसांत १० हजारांहून अधिक खेळाडू व प्रशिक्षकांचा विद्यापीठ परिसरात वावर राहणार आहे.

दरम्यान, या स्पर्धेसाठी अद्यापही नावनोंदणी सुरू असून, राज्यातील अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग घेऊन विद्यापीठाच्या सुसज्ज क्रीडा सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., कुलसचिव डॉ. महेश चोपडे तसेच क्रीडा संचालक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. पद्माकर फड यांनी केले आहे

# जागतिक सायकल स्पर्धेपूर्वी भोर तालुक्यात सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर

### ट्रकलगत लावलेले जाहिरातीचे फलक तातडीने हटवण्याची स्थानिकांची मागणी

**विशाल शिंदे**

भोर, ता. ९ : काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात होणाऱ्या जागतिक सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हातील भोर तालुका येथे स्पर्धा मार्गाची पाहणी करण्यात आली होती. या पाहणीदरम्यान संपूर्ण मार्गाची स्थिती तपासण्यात आली; मात्र रस्त्याच्या कडेला लागलेले जाहिरातीचे छोटे-मोठे फ्लेक्स हा गंभीर मुद्दा प्रशासनाच्या निदर्शनास न आल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.




स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, सायकल स्पर्धेच्या वेळी जोरदार वाऱ्यामुळे किंवा तांत्रिक कारणांमुळे एखादा फ्लेक्स तुटून किंवा उडून थेट ट्रॅकवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे घडल्यास स्पर्धकांना अपघात होऊन गंभीर दुखापत होऊ शकते. विशेष म्हणजे अनेक जाहिरातीचे फलक हे अगदी रस्त्याच्या कडेलाच, काही ठिकाणी ट्रॅकला लागूनच लावलेले आहेत.

या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तातडीने हस्तक्षेप करून सायकल ट्रॅकच्या कडेला असलेले सर्व जाहिरातीचे फलक लवकरात लवकर हटवावेत, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी केवळ रस्त्याची गुणवत्ता नव्हे तर स्पर्धकांची सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले. प्रशासनाकडून वेळेत उपाययोजना केल्यास संभाव्य अपघात टाळता येतील आणि जागतिक दर्जाच्या स्पर्धेसाठी सुरक्षित, अडथळारहित मार्ग उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# दुबईला गेलेला पुण्यातील टॅक्सी चालक अचानक गायब

**पुणे, ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील मांजरी बुद्रुक येथील आकाश जगताप या टॅक्सी चालकाची दुबईत नोकरीच्या बहाण्याने फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दीड लाख रुपये पगाराचे आमिष दाखवून एका खासगी कंपनीने त्यांना दुबईला पाठवले होते. जानेवारी २०२५ मध्ये ते परदेशात गेले आणि सुरुवातीला कुटुंबाच्या संपर्कात होते. मात्र ऑक्टोबर २०२५ पासून त्यांचे दोन्ही मोबाईल क्रमांक बंद झाले असून त्यांचा शोध लागलेला नाही.

या प्रकरणी आकाश यांच्या पत्नी अर्चना जगताप यांनी कल्याणमधील महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पतीशी संपर्क तुटल्यानंतर त्यांनी कल्याणमधील संबंधित कंपनीच्या व्यवस्थापकाची भेट घेतली, परंतु तिथून त्यांना



उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. आपल्या पतीची मानवी तस्करी करून त्यांना तिथे डांबून ठेवले असावे, असा संशय अर्चना यांनी तक्रारीत व्यक्त केला आहे. पोलिसांनी या तक्रारीनंतर कंपनीच्या व्यवस्थापकासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. नोकरीच्या नावाखाली परदेशात पाठवून फसवणूक करणारी मोठी टोळी यामागे असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेमुळे जगताप कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून पोलीस आता तांत्रिक मदतीने आकाश यांचा शोध घेत आहेत.



# शिक्रापुरात फोटोंची भीती दाखवून युवतीवर अत्याचार

**शिक्रापूर, ता. ९ :** वाडागाव (ता. शिरूर) येथे एका युवतीला मोबाइलमधील छायाचित्रांची धमकी देत तिच्यावर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी धनंजय सुभाष शितोळे याच्याविरोधात अत्याचार तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित युवती व आरोपी यांची ओळख फुलगाव येथील एका खासगी कंपनीत नोकरी करत असताना झाली होती. याच काळात आरोपीने कंपनीच्या कार्यालयात युवतीसोबत काही छायाचित्रे काढली होती. या छायाचित्रांचा गैरवापर करून आरोपीने युवतीला वाडागाव येथील आपल्या घरी बोलावले आणि छायाचित्रे नातेवाईकांना दाखवण्याची धमकी दिली.

या भीतीपोटी आरोपीने युवतीवर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, ही घटना कोणाला सांगितल्यास छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल करण्याची आणि मारहाण करण्याची धमकीही दिल्याचे पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे.

दरम्यान, अखेर धैर्य एकवटून पीडित युवतीने शिक्रापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास शिरूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले करत आहेत.

# नऊ वर्षांत ७५ हजार कोटी खर्च केले तर मग विकास कुठंय?

### उपमुख्यमंत्री अजित पवारांचा भाजप नेत्यांना सवाल

**पुणे, ता. ९ :** पुणे शहराच्या विकासावर गेल्या ९ वर्षांत जो प्रचंड पैसा खर्च झाल्याचा दावा भाजप करत आहेत, त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भवानीपेठेत पार पडलेल्या सभेमध्ये बोलताना त्यांनी थेट ७५ हजार कोटी रुपयांच्या हिशोबावर शंका व्यक्त केली. इतका मोठा निधी वापरूनही शहरात नेमकी कोणती ठोस कामे झाली, असा सवाल त्यांनी विचारला आहे.

पुण्याची सत्ता ज्यांच्या हातात होती, भाजपला शहराचा विकास साधता आला नाही आणि म्हणूनच नागरी सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाला असल्याची टीका त्यांनी केली. जागतिक स्तरावर ५०० शहरांचा जो अभ्यास झाला, त्यात



पुण्याचा वाहतूक कोंडीत जगात ४ था क्रमांक लागला, ही गोष्ट अत्यंत दुर्दैवी असून हे सत्ताधाऱ्यांचे अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुण्यातील रस्ते, पाण्याची टंचाई आणि प्रदूषण या समस्यांनी नागरिक त्रस्त असतानाच महापालिकेतील सफाई कामात मोठा घोटाळा असल्याचे त्यांनी उघड केले. कागदावर १२ हजार ३५० सफाई कर्मचारी असल्याचे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात त्यातील अनेक जण कामावरच नसल्याचे त्यांनी पुराव्यासह सांगितले.

बोगस नावांनी कोट्यवधी रुपये लुटले जात असून हे प्रकार थांबवण्यासाठी शहरात राजकीय बदल घडवणे गरजेचे असल्याचे आवाहन त्यांनी केले. ७५ हजार कोटी रुपये नेमके कोणाच्या खिशात गेले, असा खोचक प्रश्न विचारत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे संकेत दिले आहेत. पुण्याच्या हितासाठी आता नवीन विचारांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# स्मार्ट सिटी आणि हायपरलूपसारख्या प्रकल्पांचे पुढे काय झाले : पृथ्वीराज चव्हाण

**पुणे, ता. ९ :** पुणे मेट्रो प्रकल्पाची संकल्पना, मंजुरी आणि पायाभरणी काँग्रेस सरकारच्या काळातच झाली असून भाजपने त्याचे श्रेय घेऊ नये, असा ठाम दावा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना तत्कालीन नगरविकासमंत्री कमलनाथ यांनी पुणे मेट्रोला परवानगी दिली आणि मुख्यमंत्री असताना माझ्या हस्ते भूमिपूजन झाले, असे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसच्या पुणेकरांचा अधिकारनामा या जाहीरनाम्याचे प्रकाशन झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत चव्हाण बोलत होते. यावेळी पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र प्रभारी सतेज पाटील उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले की, जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत काँग्रेसने पुणे शहराला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला.



मेट्रो प्रकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रे उपलब्ध असून या प्रकल्पासाठी आपण स्वतः पाठपुरावा केला होता. मुंबईनंतर पुण्याला मेट्रो मंजुरी देताना नागपूरला डावलणे योग्य ठरणार नाही, म्हणून तेथेही मेट्रोला मंजुरी देण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुण्यासाठी ८० हजार कोटी रुपयांच्या घोषणांवर टीका करताना चव्हाण म्हणाले, घोषणा करायला पैसे लागत नाहीत. स्मार्ट सिटी आणि हायपरलूपसारख्या प्रकल्पांचे पुढे काय झाले, याचे उत्तर भाजपने द्यावे. केवळ घोषणा करून एकही प्रकल्प पूर्ण न करणे म्हणजे जनतेच्या डोळ्यात धूळफेक आहे.

पुण्यातील सद्यस्थितीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, शहरात एकही नवीन कंपनी येत नाही. भ्रष्टाचार, वाहतूक कोंडी आणि कोलमडलेल्या पायाभूत सुविधांमुळे अनेक कंपन्या शहराबाहेर जात आहेत. वाढते प्रदूषण लक्षात घेता काही दिवसांत पुण्याची अवस्था दिल्लीसारखी होण्याची भीती आहे.

दरम्यान, सतेज पाटील यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर चिंता व्यक्त केली. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष पुणेकरांची फसवणूक करत असून त्यांच्यात नुरा कुस्ती सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. तसेच माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यावर टीका करणे ही भाजप प्रदेशाध्यक्षाची वैचारिक दिवाळखोरी असल्याचेही पाटील म्हणाले.

# निवडणूक प्रचाराच्या गडबडीत सोनसाखळी चोरट्यांचा उच्छाद

### बाणेर, हडपसरमधील दोन जेष्ठ महिलांचे दागिने चोरी

**पुणे, ता. ९ :** महानगर पालिका निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरु असून शहरातील विविध भागांत पोलीस बंदोबस्त तैनात आहे. मात्र, याचा फायदा घेऊन सोनसाखळी चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. बाणेर आणि हडपसर परिसरात दुचाकीस्वार चोरट्यांनी पादचारी ज्येष्ठ महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेल्याच्या दोन घटना घडल्या असून, शहरातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

बाणेर परिसरात महापालिकेच्या सावित्री वर्किंग वुमेन्स हॉस्टेलसमोर बुधवारी (७ जानेवारी) सायंकाळी पावणे आठच्या सुमारास ही घटना घडली. बाणेरमध्ये राहणाऱ्या एक ७० वर्षीय ज्येष्ठ महिला पायी जात




असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपयांची सोनसाखळी हिसकावून नेली.

याप्रकरणी संबंधित महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक रायकर पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, हडपसर परिसरातही अशाच प्रकारची घटना घडली. हडपसर मधील श्री काळूबाई मंदिरासमोर बुधवारी रात्री दहाच्या सुमारास एका ज्येष्ठ महिलेकडील सुमारे ७० हजार रुपयांचे दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेले. महिलेने आरडाओरड केली; मात्र चोरटे भरधाव वेगात पसार झाले. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक सत्यवान गेंड पुढील तपास करीत आहेत.

# फिरत्या गर्भलिंग निदान केंद्रावर छापा; बोगस डॉक्टरला अटक, बार्शी परिसरात कारवाई

**बार्शी, ता. ८ :** तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे बेकायदेशीर गर्भपात केल्याने २८ वर्षीय विवाहितेचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा ग्रामीण भागात सुरू असलेल्या एका हायटेक रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. माढा तालुक्यातून बार्शीत येऊन कारमधून चालवले जाणारे फिरते गर्भलिंग निदान केंद्र तालुका पोलिसांनी केलेल्या कारवाईने उजेडात आले आहे. या कारवाईत एका बोगस डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. त्यास मंगळवारपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

अजित सुरेश मस्तुद (वय ३६, रा. रोपळे, ता. माढा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्या कारमध्ये गर्भपाताच्या गोळ्यांची ५१ रिकामी पाकिटे व इतर २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या धक्कादायक पुराव्यामुळे



बार्शी तालुका पुन्हा एकदा अवैध गर्भपाताचे हब बनत आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक सायकर यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, जामगाव (आ) शिवारात वाणेवाडी रस्त्यावरील एका पडीक शेतात एक संशयास्पद कार उभी असून तिथे बेकायदेशीर गैरकृत्य सुरू आहे. या माहितीच्या आधारे पोलिस पथक तेथे गेले असता एमएच ४५ एझेड २१६६ या क्रमांकाची पांढऱ्या रंगाची कार उभी असलेली दिसली. पोलिसांनी या कारवर छापा टाकला असता, आतमध्ये अजित मस्तुद हा इसम आढळून आला. त्याच्याकडे वैद्यकीय व्यवसायाचा कोणताही वैध परवाना अथवा कागदपत्रे नव्हती.

याप्रकरणी डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या फिर्यादीवरून अजित मस्तुद याच्यावर गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पोलिस उपनिरीक्षक बालाजी वाळसने, तसेच पोलिस हवालदार रेवनाथ भोंग, सुभाष सुरवसे, पोलिस नाईक मंगेश बोधले, शैलेश शिंदे, युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे आणि राहुल बोंदर यांच्या पथकाने ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. शीतल बोपलकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.